आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 05.11.2026 **वार : गुरुवार**

ठळक बातम्या

1. सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठी अग्नीवीरांची मुदत आणखी 2 वर्षांनी वाढवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता.
2. महाराष्ट्रातील 73 लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 5 हजार रुपयांची अग्रिम मदत जमा.
3. अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विरोधातील डेमोक्रेटिक पक्षाला बहुमत, इराण युद्धाचा निकालावर परिणाम झाल्याची ट्रम्प यांची कबुली.
4. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत भारताची विजयी सलामी.

सविस्तर बातम्या

अग्नीवीर मुदतवाढ

सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारनं काल मंजुरी दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या या निर्णयानुसार, अग्निवीरांचा कालावधी दोन वर्षांनी वाढवण्यात आला आहे. अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीतल्या सुमारे 18 हजार अग्निवीरांचा चार वर्षांचा कालावधी डिसेंबरमध्ये पूर्ण होणार आहे. सध्याच्या योजनेनुसार चार वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर 25 टक्के अग्नीवीरांना सैन्य दलात सामील केलं जात होतं. आता उर्वरित 75 टक्के अग्निवीरांनाही सैन्यात सामावून घेण्यासाठी त्यांचा कालावधी दोन वर्षांनी वाढवण्यात आला आहे. त्यांना या काळात अतिरिक्त प्रशिक्षण दिलं जाणार असून, त्यानंतर इच्छूक अग्निवीरांना सैन्यदलात सहभागी करून घेतलं जाईल, अशी माहिती सरसेनाध्यक्ष एन. एस. राजा सुब्रमणी यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली.

राजनाथ सिंह

भविष्यासाठी अधिक तंत्रज्ञान सुसज्ज, भक्कम सैन्यदल तयार करण्याच्या उद्देशानं अग्निवीरांचा कालावधी दोन वर्षांनी वाढवण्यात आला आहे. त्यानंतर त्यांची लष्करात निवड केली जाईल. बदलतं युद्धस्वरुप लक्षात घेऊन भारतीय लष्कर सज्ज करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

जलद गती न्यायालयं

बाल लैंगिक अत्याचार आणि बलात्कार पीडितांचे खटले चालवण्यासाठी साडे आठशे जलदगती न्यायालयं आणखी 5 वर्ष सुरू ठेवण्याचा निर्णयही काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. यासाठी 3 हजार 788 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे, असं; माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं स्वच्छ ऊर्जा कार्यक्रमाला अधिक बळकट करण्यासाठी 92 गीगावॅट क्षमतेच्या ऊर्जा साठवणूक योजनेला तसंच, पाच वर्षांच्या कालावधीत 2 हजार कोटी रुपयांहून अधिक आर्थिक तरतुदीसह महत्त्वपूर्ण खनिजांच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देण्यासाठी भांडवली खर्च सहाय्य योजनेलाही मंजुरी दिली आहे.

विस्तार योजना

केंद्रीय मंत्रीमंडळानं काल 4 हजार 371 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चासह विकसित भारत सांख्यिकी परिवर्तन, विश्लेषण आणि संशोधनासाठीच्या विस्तार योजनेलाही मंजुरी दिली.

मोदी भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत सहभागी भारतीय खेळाडूंशी दिल्लीत भेट घेणार आहेत. जपान इथं नुकत्याच झालेल्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत 97 दिव्यांग भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत, 30 सुवर्णपदकांसह 114 पदकं मिळवली. दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमामध्ये पदक विजेते खेळाडू, प्रशिक्षक, ऑलिम्पिक समितीचे सदस्यांसह इतर प्रतिनिधी उपस्थित राहाणार आहेत.

मतदार यादी नमुना

मतदार यादीत पूर्वी नाव समाविष्ट असतानाही; काही मतदारांची नावं पुनरीक्षण प्रक्रियेनंतर प्रारूप यादीतून वगळली गेली होती; या नागरिकांना मतदार यादीत पुन्हा नाव नोंदवण्यासाठी नमुना क्रमांक 6 द्वारे अर्ज करता येणार असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. असा अर्ज करणे म्हणजे मतदाराने फसवणूक केल्याचं मानलं जाणार नाही आणि त्यावर कायदेशीर कारवाईदेखील होणार नसल्याचं आयोगानं स्पष्ट केलं आहे. नाव वगळल्या गेलेल्या मतदारांमध्ये नवीन अर्ज करताना गोंधळ निर्माण झाला होता. त्यानंतर आयोगानं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

संरक्षण वैधता

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांना, पदावर नियुक्त असताना केलेल्या कृत्यांसाठी संपूर्ण कायदेशीर संरक्षण देणाऱ्या तरतुदीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि भारतीय निवडणूक आयोगाकडून प्रतिक्रिया मागवल्या आहेत. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची, व्ही. मोहना यांच्या खंडपीठानं, याबाबतच्या याचिकेवर काल नोटीस बजावली.

अग्रीम मदत जमा

महाराष्ट्रातील 73 लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 5 हजार रुपयांची अग्रिम मदत जमा करण्यात आली आहे; येत्या दोन दिवसात 95 टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात मदत रक्कम जमा होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांना दिली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येत असलेल्या या मदतीव्यतिरिक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेंची रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

अमित शहा

हरयाणातल्या अंबाला छावणी इथं 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धातील शूर हुतात्म्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक भव्य स्मारक उभारण्यात आलं आहे. या स्मारकांचं उद्घाटन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. भाजप नेते आणि माजी मंत्री असीम गोयल यांनी काल अंबाला इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या स्मारकावर 1857 च्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित 700 हून अधिक शूर हुतात्म्यांची नावे सुवर्ण अक्षरांनी कोरण्यात आली आहेत.सुमारे 22 एकर परिसरात आणि सुमारे 800 कोटी रुपये खर्चून उभारलेले या भव्य स्मारकात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या स्मारकात स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास जिवंत करण्यात आला आहे.

अमेरिका-निवडणूक

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये मतदारांनी अमेरिकन काँग्रेस आणि सिनेटची सूत्र डेमोक्रेटिक पक्षाकडं दिली आहेत. अमेरिकन काँग्रेसमध्ये डेमोक्रॅट्सच्या 25 जागा वाढल्या असून त्यांना 435 पैकी 228 जागा मिळाल्या आहेत. तर सिनेटमध्ये डेमोक्रेटिक पक्षाच्या 7 जागा वाढल्यानं त्यांच्याकडे 110 पैकी 54 जागा आल्या आहेत. निवडणुकीपूर्वी या दोन्ही सभागृहात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाकडे बहुमत होतं. या निवडणुकांमध्ये भारतीय वंशाच्या अनेक अमेरिकन उमेदवारांनी चांगली कामगिरी केली आहे.

अमेरिका डोनाल्ड ट्रम्प

दरम्यान, इराणबरोबर केलेल्या युद्धाचा परिणाम मध्यावधी निवडणुकांवर झाल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कबूल केलं आहे. मात्र, हा संघर्ष करणं अपरिहार्य होतं असंही ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. इराणच्या बाबतीत आम्हाला जे करावे लागले, ते आम्ही केले आणि आम्ही ते पुढेही करत राहू, असंही ते म्हणाले.

औषध नियम

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं औषध नियम, 1945 मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावानुसार, एखादं औषध विशिष्ट महत्त्वाच्या गुणवत्ता निकषांवर 'अयोग्य दर्जाचं' असल्याचं आढळलं, तर त्याचा उत्पादन परवाना त्वरित निलंबित केला जाईल, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

खेलो भारत

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं माय भारत पोर्टलवर 'खेलो भारत: उत्पादन ते पोडियम फिनिश ही प्रश्नमंजुषा सुरू केली आहे. ही प्रश्नमंजुषा नागरिक, विद्यार्थी, तरुण, व्यावसायिक आणि क्रीडाप्रेमींसाठी खुली असून, ती या महिन्याच्या 20 तारखेपर्यंत सुरू राहील. या उपक्रमाद्वारे देशातील क्रीडा साहित्य उत्पादन, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा नैपुण्य यांचा समावेश असलेल्या क्रीडा परिसंस्थेबद्दल माहिती घेण्यास लोकांना प्रोत्साहित केलं जाणार आहे, असं क्रिडामंत्रालयानं म्हटलं आहे.

टेनिस

भारताची 17 वर्षीय टेनिसपटू माया राजेश्वरन रेवती हिनं डब्ल्यूटीए स्पर्धेतील एकेरी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. 2012 मधील सानिया मिर्झाच्या कामगिरीनंतर, या फेरीत प्रवेश करणारी माया ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. फेब्रुवारी 2012 मध्ये सानिया मिर्झानं पटाया खुल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

मायानं चेन्नई खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत, पोलंडच्या वेरोनिका फाल्कोव्स्काचा पराभव केला.

हॉकी

आशियाई अजिंक्यपद करंडक स्पर्धेतला अंतिम सामना आज भारत आणि जपान यांच्यात होणार आहे. मोहाली इथल्या ऑलिम्पिकपटू बलबीर सिंग सीनियर आंतरराष्ट्रीय हॉकी मैदानावर संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. गतविजेत्या भारतानं काल झालेल्या उपांत्य फेरीत दक्षिण कोरियावर 8-1 असा दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं, तर जपाननं मलेशियाविरुद्धच्या अत्यंत चुरशीच्या लढतीत विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

क्रिकेट

भारतीय क्रिकेट संघानं न्यूझीलंड दौऱ्यातल्या एकदिवसीय मालिकेत विजयी सलामी दिली आहे. ऑकलंड इथं काल झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडवर 5 गडी आणि 56 चेंडू राखून विजय मिळवला आणि 5 सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली. पावसाच्या व्यत्ययामुळे डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार खेळविण्यात आलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं 185 धावा केल्या होत्या; परंतु पावसाच्या व्यत्ययामुळे भारतासमोर 38 षटकात 142 धावांचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. विराट कोहलीनं 74 धावांची खेळी करत आपल्या कारकिर्दीतील 80वं अर्धशतक झळकावले. भारताकडून अर्शदीप सिंहने 4, अंशुल कंबोजने 2 तर गुरनूर ब्रारने 3 बळी घेत न्यूझीलंडच्या फलंदाजांना रोखलें. अंशुल कंबोज सामनावीर ठरला. या मालिकेतला दुसरा सामना सात नोव्हेंबर रोजी वेलिंग्टन इथं होणार आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.